RNI No. MAHBIL /2009/31748



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–अ-मध्य उप-विभाग

वर्ष १, अंक ३९(२)] बुधवार, जून १७, २०१५/ज्येष्ठ २७, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ६८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त)

आदेश व अधिसूचना.

नगरविकास विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जून २०१५

अधिसूचना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.

क्रमांक स्थासंक. २०१५/प्र.क्र. ८२/२०१५ नवि-३२.— महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ च्या नियम ४८ मधील उप नियम (९) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने थकीत करावरील व्याज व दंड माफ करणारी स्थानिक संस्था कर अभय योजना दिनांक ३ जून २०१५ च्या अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केली आहे. या स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ मध्ये थकीत रकमांची २५ महानगरपालिकांमध्ये प्रभावीपणे वसुली होण्याकरिता अधिक सुधारणा करीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ च्या नियम ४८ मधील उप नियम (९) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन खालीलप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अभय योजना २०१५ मध्ये सुधारणा करीत आहे.

१. या योजनेस महाराष्ट्र महानगरपालिका सुधारित स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ असे म्हणावे.

२. दिनांक ३ जून २०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्थानिक संस्था कर अभय योजनेतील अ. क्र. ३ मधील उप क्र. (vii) (viii) व (ix) या तरतुदी वगळून त्याऐवजी खालील तरतुदींचा समावेश करण्यात येत आहे.

३. (vii) स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५ अन्वये प्राप्त होणाऱ्या विवरणपत्रांची १०० टक्के निर्धारणा करणे आवश्यक राहील.

३. (viii) सदरहू अभय योजनेखाली विवरणपत्र दाखल करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०१५ आहे. त्यानंतर व्यापाऱ्यांकडे थकीत असलेल्या स्थानिक संस्था कर, व्याज व दंडासह वसूल करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका स्थानिक संस्था कर (सुधारणा) नियमातील सर्व तरतुदींचा वापर करुन वसूल करण्यात येईल.

३. (ix) सदरहू योजनेखाली प्राप्त होणाऱ्या विवरणपत्राची पडताळणी दिनांक ३१ मार्च २०१६ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, महानगरपालिकांकडून जर तशी मागणी आल्यास विवरणपत्राच्या पडताळणीस मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो. आ. लोखंडे,
शासनाचे उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 17th June 2015

NOTIFICATION

MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

No. LBT. 2015/C.R. 82/2015/UD-32.—Whereas, in exercise of the powers conferred under clause (*a*) of sub-rule (9) of rule 48 of Maharashtra Municipal Corporation (Local Body Tax) (Amendment) Rules, 2015, the Government of Maharashtra has declared the Local Body Tax Amnesty Scheme 2015 for waiver of interest and penalty, from 3rd June 2015 ;

And whereas, now the Government is of the opinion that for the better recovery of pending Local Body Tax, it is to amend the Maharashtra Municipal Corporations Amnesty Scheme 2015 for waiver of interest and penalty in twenty five Municipal Corporations area.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Clause (*a*) of sub-rule (9) of rule 48 of the Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2015 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following scheme to amend the Maharashtra Municipal Corporations Amnesty Scheme, 2015.

1. This Scheme may be called as Maharashtra Municipal Corporations Local Body Tax Amnesty Amendment Scheme 2015.

In clause 3 of the Maharashtra Municipal Corporations Local Body Tax, Amnesty Scheme 2015, for sub-clauses (*vii*), (*viii*) and (*ix*), the following sub-clauses shall be substituted namely :—

2. *3(vii)* :-- There shall be 100 percent assessment of traders under the Amnesty Scheme.

3(viii) :-- The last date of filling returns under Amnesty Scheme is 31st July 2015 and then thereafter all the pending tax arrears will be recovered along with interest and penalty as per the provision of Maharashtra Municipal Corporation Act and Maharashtra Municipal Corporations Local Body Tax (Amendment) Rules.

3(ix) :--The assessment of returns filed under Amnesty Scheme 2015 shall be completed before 31st March 2016. However this date may be extended beyond 31st March 2016 on the request of Corporations.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. A. LOKHANDE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.